प्रसनाट

नाशिक २८/८/२०२५

लोकसेवक गौरव शंकर दवंगे, व्यवसाय—ग्राम महसुल अधिकारी, सजा चेहडी बु.ता.जि.नाशिक यांनी १,०००/—रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यान्वये कारवाई केलेबाबत.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग /घटक गुन्हा नोंद क्रमांक | नाशिक |
| गुन्हा नोंद क्रमांक | नाशिक रोड पोलीस स्टेशन, नाशिक शहर गु.र.न.४२६/२०२५ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे |
| आरोपीचे नाव वय व कार्यालय | श्री.गौरव शंकर दवंगे , वय ३१ वर्षे, ग्राम महसुल अधिकारी, सजा. चेहडी बु. ता.जि.नाशिक, वर्ग ३, रा.बी—२, अक्षर बंगलो, निसर्ग नगर, म्हसरुळ, ता.जि. नाशिक |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १,०००/— रूपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १,०००/— रूपये |
| थोडक्यात हकीगत— | यातील आलोसे श्री.गौरव शंकर दवंगे हे चेहडी बु. ता.जि. नाशिक येथे ग्राम महसुल अधिकारी या पदावर कार्यरत असुन तक्रारदार यांचे बहिणीचे मालकीचे मौजे चेहडी बु. येथील सर्व्हे नं. ४/१/ह/प्लॉट/११ क्षेत्र ११९.५३१ चौ.मी. या प्लॉटचे बक्षीस पत्रकाची नोंद ७/१२ उताऱ्यावर करुन देण्याकरिता आलोसे हे लाचेची मागणी करीत असलेबाबत तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक कार्यालयात तक्रार दिली.<br>सदर तक्रारीवरुन ला.प्र.वि. नाशिक पथकाने पडताळणी करुन सापळा आयोजित केला असता सापळा कारवाई दरम्यान आलोसे गौरव शंकर दवंगे, ग्राम महसुल अधिकारी, सजा चेहडी बु.यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे बहिणीचे मालकीचे मौजे चेहडी बु. येथील सर्व्हे नं. ४/१/ह/प्लॉट/११ क्षेत्र ११९.५३१ चौ.मी. या प्लॉटचे बक्षीस पत्रकाची नोंद ७/१२ उताऱ्यावर करुन दिल्याच्या मोबदल्यात दि. १९/८/२०२५ रोजी १,०००/—रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम दि. २८/८/२०२५ रोजी १४:०० वाजेचे सुमारास तलाठी कार्यालय,चेहडी बु.येथे त्यांचे कक्षात पंच साक्षीदारासमक्ष स्विकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आल्याने त्यांचेविरुध्द दिनांक २८/८/२०२५ रोजी नाशिक रोड पोलीस स्टेशन , नाशिक शहर गु.र.न. ४२६/२०२५ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आले. तरी लोकसेवक गौरव शंकर दवंगे यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग करुन भ्रष्ट व बेकायदेशीर मार्गाने स्वत:चा आर्थीक लाभ करुन घेतला. म्हणून त्यांनी भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे गुन्हा केला आहे. |
| सापळा कारवाई | १) श्रीमती सुवर्णा रंगनाथ हांडोरे, पोलीस निरीक्षक<br>२) पोहवा/प्रफुल्ल माळी<br>३) पोना/विलास निकम |
| मार्गदर्शन | १) मा.श्री.भारत तांगडे, पोलीस अधिक्षक, ला.प्र.वि., नाशिक परिक्षेत्र, नाशिक.<br>२) मा.श्री.माधव रेड्डी, अपर पोलीस अधिक्षक, ला.प्र.वि. नाशिक परिक्षेत्र नाशिक.<br>३) मा.श्री.सुनिल दोरगे, अपर पोलीस अधिक्षक, ला.प्र.वि.., नाशिक परिक्षेत्र, नाशिक. |

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक येथे संपर्क करावा.

संपर्क पत्ता :— ला.प्र.वि., नाशिक परिक्षेत्र, नाशिक.
संकेतस्थळ :— acbmaharashtra.gov.in
ई मेल :— spacbnashik@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार :— spacbnashik@mahapolice.gov.in
टोल फ्री क्रमांक :— १०६४
दुरध्वनी क्रमांक :— ०२५३—२५७५६२८, २५७८२३०
व्हॉट्स ॲप क्र. :— ९९३०९९७७००

पोलीस निरीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक सत्यमेव जयते

सुवर्णा हांडोरे
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक